## केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ अन्वये अर्ज .

(जोडपत्र "अ" नियम (३) पहा)

मा.अ. 58
दि. 26/02/2021

प्रति,




जनमाहिती अधिकारी,

आस्थापना ~~[illegible]~~ विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका
ता. जि. - ठाणे

१ . अर्जदाराचे नाव : श्री . गणेश भानुदास दीक्षित . मो . नं . ९७०२७१८१८२

२ . पत्ता : जी २/अे, श्री अयोध्या निवास, कपोल बँक समोर, गोडदेव नाका, भाईदर पुर्व . ता . जि . ठाणे ४०११०५ .

३ . माहीतीचा विषय : आस्थापना व कर्मचारी बाबत सविस्तर माहिती मिळणेबाबत.

४ . माहितीचा कालावधी :

५ . माहीतीच तपशील : (1) भौगोलीक दृष्ट्या महानगर पालीकेची हद्द कोठुन - कोठपर्यंत आहे. (2) कार्यक्षेत्राचे एकुण क्षेत्रफळ किती आहे. (3) कार्यक्षेत्राचे व्यवस्थापन कसे केले आहे. (4) महानगर पालिकेकडे एकुण कर्मचारी संख्या पद निहाय प्रमाणे किती व कशी आहे. (5) पदनिहाय अधिकारी / कर्मचारी आपल्या कार्याचा अहवाल कोणाला किती कालावधीत देतात याची माहिती सत्य प्रत करून देण्यात यावी.

सर्व लिपिक

६ . माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : व्यक्तिश :/टपाल

शासकीय नियमानुसार होणारी फी मी देण्यास तयार आहे .

ठिकाण . - भाईंदर

Ganesh B. Dixit

दिनांक : 26-02-2021

अर्जदाराची सही
9702718182

नोट : . जर ही माहीती तुमच्या कार्यालयाशी संबधीत नसेल तर **RTI Act 2005 sec-6(3)** च्या तरतुदीनुसार संबंधीत कार्यालयास हस्तांतर करावे व त्याची प्रमाणीत प्रत मला मिळावी ही नम्र विनंती .

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,**
**भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.**

**जा.क्र.मनपा/आस्था/ 58 /2021-22** **दि. 30 / 04 /2021**

प्रति,
मा. जनमाहिती अधिकारी तथा
नगरसचिव,
सचिव विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
स.प./न.प./ज.प.
आवक क्र. 22/2021......
दिनांक:- 3 / 4 /2021

विषय :- आस्थापना व कर्मचारी बाबत सविस्तर माहिती मिळणेबाबत.

संदर्भ :- श्री. गणेश भानुदास दिक्षित यांचेकडील दि.26/02/2021 रोजीचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत अर्ज.

विषयांकित प्रकरणी आस्थापना व कर्मचारी बाबत सविस्तर माहिती मिळणेबाबत श्री. गणेश भानुदास दिक्षित यांनी माहिती अधिकार अंतर्गत अर्ज केला आहे.

सदर माहिती अधिकार अर्जातील मुद्दा क्र. 01, 02 व 03 हा आपल्या विभागाशी निगडीत असल्याने सदर मुद्दयांची माहिती तक्रारदारास कळविणेकरीता वर्ग करण्यात येत आहे. (सोबत दि.26/02/2021 रोजीच्या पत्राची छायांकित प्रत आपल्या माहितीस्तव जोडून देण्यात येत आहे.)

(सुनिल यादव)
प्रशासकीय अधिकारी
आस्थापना विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

016

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/माहिती अधिकार/22/2021 दिनांक :- 03/05/2021

प्रति,
श्री. गणेश भानुदास दिक्षीत,
जी 2/अे, श्री. अयोध्या निवास,
कपोल बँकेसमोर, गोडदेव नाका,
भाईंदर (पु.) ता. जि.ठाणे.

विषय :- कैंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.
आस्थापना व कर्मचारी बाबत सविस्तर माहिती मिळणेबाबत.

संदर्भ :- 1. प्रशासकीय अधिकारी, आस्थापना विभाग यांचेकडील जा.क्र.मनपा/आस्था/58/ 2021-22 दि. 30/04//2021 रोजीचे पत्र. (या कार्यालयास पत्र प्राप्त दि. 03/05/2021)
2. आपणांकडील दि. 26/02/2021 रोजीचा माहिती अधिकार नियमांतर्गत अर्ज.

महोदय,

प्रशासकीय अधिकारी, आस्थापना विभाग यांनी संदर्भित पत्र क्र. 01 अन्वये आपणांकडील माहिती अधिकार नियमा अंतर्गत प्राप्त अर्जातील मुद्दा क्र. 01, 02 व 03 बाबतची माहिती आपणांस उपलब्ध करुन देणेसाठीं आपणांकडील संदर्भिय क्र. 02 च्या अर्जाची छायांकित प्रत नगरसचिव विभागाकडे वर्ग केली आहे.

मुद्दा क्र. 01 ते 03 चे अवलोकन केले असता, मुद्दा क्र. 01 व 02 नगरसचिव विभागाशी निगडीत असून, मुद्दा क्र. 03 या कार्यालयाशी निगडीत नाही. करिता या कार्यालयाकडील पत्र क्र. जा.क्र. मनपा/सचिव/माहिती अधिकार/22/2021-22, दि. 03/05/2021 अन्वये मुद्दा क्र. 03 नगरसचिव विभागाशी निगडीत नसलेबाबत प्रशासकीय अधिकारी, आस्थापना विभाग यांना कळविण्यात आले आहे.

आपल्या पत्रातील मुद्दा क्र. 01 च्या अनुषंगाने, महानगरपालिकेच्या भौगोलिक हद्दीबाबत सन 2017 च्या सार्वत्रिक निवडणुकीमधील अंतिम प्रभाग रचनेच्या नकाशाची प्रत सोबत जोडून देत आहोत. तसेच मुद्दा क्र. 02 नुसार, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे एकुण भौगोलिक क्षेत्रफळ 79.40 चौ.कि,मी. इतके आहे.

नगरसचिव विभागाच्या अभिलेखी उपलब्ध असलेल्या माहितीवरुन, आपणांस वरीलप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यात येत असुन, सदर माहितीबाबत आपणास आणखी विचारणा करावयाची असल्यास माझ्याशी प्रत्यक्ष अथवा भ्रमणध्वनी क्र. 9967481732 वर संपर्क साधावा.

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

कळावे.

(कैलास दो. म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी तथा लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका
(भ्रमणध्वनी क्र. 9967481732)

Mahiti 03/05/2021

pc 2Z:\Pranali\Mahiti Adhikar\Letter - Ganesh Dikshit.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग


जा.क्र.मनपा/सचिव/माहिती अधिकार/22 /2021 दिनांक :- 3 /4 /2021

प्रति,
मा. प्रशासकीय अधिकारी,
आस्थापना विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.
आस्थापना व कर्मचारी बाबत सविस्तर माहिती मिळणेबाबत.

संदर्भ :- 1. आपणांकडील जा.क्र.मनपा/आस्था/58/ 2021-22 दि. 30/04//2021 रोजीचे पत्र.
2. सोबत श्री. गणेश भानुदास दिक्षीत यांचा दि. 26/02/2021 रोजीचा माहिती अधिकार नियमांतर्गत अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्र क्र. 01 अन्वये आपण, श्री. गणेश भानुदास दिक्षीत यांचेकडील संदर्भित पत्र क्र. 02 मधील मुद्दा क्र. 01, 02 व 03 नगरसचिव विभागाशी निगडीत असल्याचे कळवून, उक्त मुद्दयांची माहिती अर्जदारांस परस्पर उपलब्ध करुन देणेसाठी संदर्भिय क्र. 02 च्या पत्राची छायांकित प्रत नगरसचिव विभागाकडे वर्ग केलेली आहे.

श्री. गणेश भानुदास दिक्षीत यांचेकडील संदर्भित पत्र क्र. 02 मधील मुद्दा क्र. 01 ते 03 चे अवलोकन केले असता, मुद्दा क्र. 01 व 02 नगरसचिव विभागाशी निगडीत असून, मुद्दा क्र. 03 कार्यक्षेत्राचे व्यवस्थापन कसे केले आहे? हा विषय नगरसचिव विभागाशी निगडीत नाही.

कळावे.

मा. नगरसचिव यांचे मान्यतेने

(कैलास दा. म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

03/05/2021
पोच
लिपिक (आस्थापना विभाग)
मिरा भाईंदर महानगरपालिका


03/05/2021

pc 2Z:\Pranali\Mahiti Adhikar\Letter - Ganesh Dikshit.docx

मिरा भाईन्दर महानगरपालिका
सार्वत्रिक निवडणूक २०१७
अंतिम प्रभाग रचना

टिप
—— या प्रमाणे प्रभाग रचनेची हद्द दर्शविलेली आहे.

SCALE- N.T.S.





मिरा - भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय
भाईंदर (प.)



माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका